# वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQ) :-

1) वैयक्तिक शेतकऱ्याला स्मार्ट मध्ये प्रकल्पासाठी अर्ज करता येईल का? लाभ मिळेल का व किती मिळेल.

**उत्तर**: वैयक्तिक शेतकऱ्याला स्मार्ट उपप्रकल्पाचा लाभ देय नाही. स्मार्ट प्रकल्पांतर्गत समुदाय आधारीत संस्थांना उपप्रकल्प देय आहे. समुदाय अधारित संस्थांमध्ये शेतकरी उत्पादक कंपनी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत महिला बचत गटांचे स्थापित प्रभाग संघ, माविम अंतर्गत स्थापित महिला बचत गटांचे लोकसंचलित साधन केंद्र, आत्मा नोंदणीकृत शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्याचे फेडरेशन्स यांचा समावेश आहे. या समुदाय आधारित संस्थांना स्मार्ट प्रकल्पांर्गत उपप्रकल्प / लाभ देय आहे.

2) FPC कोठे स्थापन करावी?

**उत्तर**: कंपनी कायद्या अंतर्गत आरओसी (Register of Company) यांच्याकडे शेतकरी उत्पादक कंपनीची नोंदणी करावी.

3) आमची शेतकरी उत्पादक कंपनी नव्याने यावर्षी रजिस्टर झाली आहे. ऑडिट करुन घेतले तर स्मार्ट मध्ये भाग घेवू शकतो का ? लाभ मिळणार का

**उत्तर**: निवडीच्या निकषानुसार शेतकरी उत्पादक कंपनीचे उत्पादक भागीदारी उप प्रकल्पासाठी किमान १ व बाजार संपर्क वाढ उप प्रकल्पासाठी किमान २ वर्षाचे लेखा परीक्षण सादर करणे अपेक्षित आहे. तसेच इतर निकषानुसार सुद्धा कंपनी पात्रतेची माहिती सादर करणे अपेक्षित आहे. जर निकष व प्राधान्यक्रमानुसार आपल्या संस्थेची निवड झाली तर उपप्रकल्पास लाभ मिळेल.

4) FPC मध्ये १० भागधारक आहेत. आम्हाला लाभ मिळेल का?

**उत्तर** :- शेतकरी उत्पादक कंपनीमध्ये १० भागधारक असतील तर लाभ मिळणार नाही. उत्पादक भागीदारी उपप्रकल्पासाठी किमान २५० भागधारक तर बाजार संपर्कवाढ उपप्रकल्पासाठी शेतकरी उत्पादक कंपनी किंवा त्यांचे फेडरेशन मध्ये

फळे भाजीपाला करीता किमान ७५० भागधारक/सदस्य व धान्य, कड धान्य पिकाकरीता २००० भागधारक/सदस्य असणे आवश्यक आहे.

5) शेतकरी गट कोठे स्थापन करू शकतो? कोणाला भेटावे.

**उत्तर**: शेतकरी गट स्थापन करणे साठी आपल्या तालुका कृषि अधिकारी किंवा प्रकल्प संचालक आत्मा कार्यालयाशी संपर्क साधावा

6) शेतकरी गटामध्ये सद्यस्थितीत 20 सभासद आहे, लेखापरिक्षण केलेले नाही, तर अर्ज करु शकतो का?

**उत्तर**: शेतकरी गट अर्ज करु शकतो जर गटाची निवड झाली तर शेतकरी उत्पादक कंपनीत नोंदणी करणे व किमान 250 भागधारक करणे तसेच इतर निकषांची पुर्तता प्रकल्प संकल्पना टिपणी (PCN) तयार करण्याच्या टप्प्यावर पूर्ण करणे बंधनकारक आहे.

7) स्मार्ट मध्ये नोकरी भरती होणार आहे का? त्याची जाहिरात प्रसिद्ध झाली आहे का ?

**उत्तर** : आता प्रकाशित झालेली जाहिरात ही फक्त उत्पादक भागीदारी व बाजार संपर्क वाढ उपप्रकल्पा करिता आहे. यासाठी समुदाय आधारित संस्था आणि खरेदीदार अर्ज करू शकतात. भविष्यात पद भरती होणार असल्यास त्याची जाहिरात प्रकल्पाच्या वेबसाइडवर प्रसिद्ध होईल.

८) ऊस, दुग्धव्यवसाय मत्स्यपालन, रेशीम, बांबू पिक अनुदान मिळणार का ?

**उत्तर** :- स्मार्ट प्रकल्पामध्ये ऊस, दुग्धव्यवसाय, मत्स्यपालन, रेशीम, बांबू या मुल्य साखळी विकासाच्या उपप्रकल्पास लाभ देय नाही.

९) खरेदीदार - प्रक्रियादार, निर्यातदार, लघु मध्यम उद्योजक, Corporates, Startups यांना अनुदान मिळणार का?

**उत्तर**:- खरेदीदारास थेट अनुदान नाही परंतु खरेदीदारास ज्या पिकाची मूल्य साखळी विकसित करायची आहे त्या साठी संबंधित सीबीओ ला अनुदान मिळेल व खरेदीदारास आवश्यक दर्जाचा तसेच आवश्यक प्रमाणात शेतमालचा

सातत्यपूर्ण पुरवठा होईल असे अपेक्षित आहे. तथापि खरेदीदारांना मूल्यसाखळी विकासाचा प्रकल्प अहवाल तयार करताना शक्य तिथे कृषि व संलग्न विभागच्या अन्य योजनांचा / प्रकल्पाचा लाभ घेता येईल.

१०) शेळी / कोंबडयांची पिले खरेदी करण्यासाठी स्मार्ट मधून अनुदान मिळेल का ?

**उत्तर** : स्मार्ट प्रकल्पामध्ये शेळ्या किंवा कोंबडयांची पिले खरेदी साठी अनुदान देय नाही.

11) सीबीओ चे २ खरेदीदारांसमवेत MoU आहेत परंतु एकच MoU अपलोड करता येतो मग कसे करावे?

**उत्तर** : ज्या सामज्यंस कराराअंतर्गत सर्वात जास्त उलाढाल/ व्यवहार झालेला असेल तो MoU उपलोड करावा.

१२) आत्मा गटांचे शासकीय ऑडिट चे रीपोर्ट चालतील का ?

**उत्तर** : नाही, सनदी लेखापालामार्फत (CA) केलेले लेखापरिक्षण अहवाल सादर करणे अपेक्षित आहे.

१३) स्मार्ट प्रकल्पामध्ये अधिकतम अनुदान किती % आहे ?

**उत्तर** : उपप्रकल्पासाठी व्यवहार्यता आंतर निधी (Viability Gap Funding) परिगणनेनुसार अनुदान देय आहे. अनुदानाची मर्यादा जास्तीत जास्त 60% आहे.

१4) सीबीओ मध्ये बिगर भागधारक नसतील तर प्रपत्र कसे भरावे किंवा अनिवार्य आहे का ?

**उत्तर** : बिगरभागधारक नसल्यास त्याची माहिती भरण्याची आवश्यकता नाही.

१5) शेळी व परस बागेतील उत्पादक भागीदारी (पीपी) उपप्रकल्पा मध्ये काम करायचे असेल तर सीबीओ निवडीचे कसे असणार आहेत.

**उत्तर** : सीबीओ कायदेशीर नोंदणीकृत असावी, कमीत कमी 1 वर्षीचे सनदी लेखापालामार्फत लेखापरिक्षण अहवाल सादर केलेला असावा, किमान भागधारक

250 असावेत, लेखापरिक्षण अहवालात उलाढाल रु 5.00 लाखापेक्षा जास्त असावी (सविस्तर संदर्भासाठी ऑनलाइन दिलेल्या माहितीचे अवलोकन करावे )

१6) शेळी व परस बागेतील उपप्रकल्पामध्ये खरेदीदार भेटत नाही बाजार संपर्कवाढ उपप्रकल्प करायचा असेल तर किती भागधारक लागतील

**उत्तर** : बाजार संपर्कवाढ उपप्रकल्प करायचा असेल तर किमान 2000 भागधारक असणे अपेक्षित आहे.

१7) शेळी पालन उपप्रकल्पामध्ये वॅल्यू ॲडिशन करून बाजार संपर्कवाढ उपप्रकल्प करता येईल का ? विपणन साठी अनुदान आहे का ?

**उत्तर** : होय.

१९) मका व सोयाबीन मध्ये पशू खाद्याचा उपप्रकल्प बनवता येईल का ?

**उत्तर** : पशुखादय खरेदीदार समवेत MoU करार झाले असल्यास किंवा MoU प्रस्तावित असल्यास पशुखादय निर्मीतीचा उपप्रकल्प घेता येईल.

२०) ३ वर्षे जून शेतकरी गट आहे, उलाढाल हि आहे पण ऑडिट केले नाही, ३ वर्षेचे ऑडिट करावे लागणार का ?

**उत्तर** : उत्पादक भागीदारी (पीपी) साठी एक वर्षाचा लेखापरिक्षण आवश्यक आहे.तसेच बाजार संपर्कवाढ उपप्रकल्पासाठी (एमएपी) किमान दोन वर्षाचा लेखापरिक्षण आवश्यक आहे.

21) स्मार्ट प्रकल्पामध्ये प्राथमिक सहकारी संस्थाना भाग घेता येईल का ?

**उत्तर** : 10 सप्टेंबर 2020 रोजी प्रकाशित झालेल्या जाहिरातीमध्ये प्राथमिक सहकारी संस्थाना भाग घेता येणार नाही परंतु स्मार्ट प्रकल्पाच्या भविष्यात येणाऱ्या जाहिरातीमध्ये प्राथमिक सहकारी पतसंस्थाना धान्यगोदाम आधारित उपप्रकल्पाचा प्राध्यान्याने लाभ देण्याचे प्रस्तावित आहे.

२२) उत्पादक भागीदारी उपप्रकल्पासाठी अर्ज करताना स्वाक्षरीत सामंजस्य करार (MoU) जोडणे बंधन कारक आहे का ?

उत्तर : नाही. तथापि स्वाक्षरीत सामंजस्य करार (MoU) जोडला असल्यास प्राधान्य देण्यात येईल.